**भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र**

**(सकाळ)**

जा.क्र.४२९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०६/२०१७

**१) मोटार सायकलची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ३१/०५/२०१७ ते १४.३० ते १७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी यांनी आपली पॅशन प्रो लाल रंगाची मोटार सायकल क्र. एमएच. ३६/एन ९२८६ किमती २०,०००/–रू. ची सा. रू. भंडारा येथे स्टॅन्ड वर लावुन दवाखाना येथे गेले व परत येवुन पाहीले तर ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल दिसुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन मोटार सायकल चोरून नेल्याने फिर्यादी अनमोल जवाहर मेश्राम वय २५ वर्ष, रा. कोडेलोहारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. किचक पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) मारोती वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे पायी जाणाऱ्या ईसमास मागेहुन धडक देवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे १८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी गणेश फत्तुजी राहुते वय ४९ वर्ष रा. आंबेडकर वार्ड बेला हा बेलदारी कामावरून पायाी घरी परत जात असतांना व रोड क्रॉस करित असता यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस मागेहुन धडक देवुन जखमी करून पळुन गेल्याने फिर्यादी जखमीचे बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४,/१८७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. घरडे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमिष दाखवुन बलात्कार करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

**सन २०१५ पासुन ते** दिनांक ०३/०६/२०१७ पर्यत यातील आरोपीने अल्पवयीन फिर्यादी पिडीत मुलीस सन २०१५ पासुन लग्नाचे आमिष दाखवुन अनेकवेळा जबरीने संभोग केल्याने गर्भधारणा झाली व या बाबत कोणाला काही सांगीतले तर जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोस्टे. कारधा येथे कलम ३७६(२),५०६ भांदवि. बा. लै. प्र. का. २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मेश्राम पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) गैरकायदयाची मंडळी जमवुन अश्लिल शब्दात बोलुन काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०२/०६/२०१७ चे २२.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादीला तु तुमसर येथे वेशा व्यवसायाचा धंदा करण्यास जाते असे म्हणुन फिर्यादी सोबत भांडण करून काठीने आरोपी क्र. १ ने डोक्यावर मारून जखमी केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. धार्मिक यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम १४३,१४७,३२४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. हावरे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**५) अनाधिकृतपने घरात प्रवेश करून भांडण व शिवीगाळ करून धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०३/०६/२०१७ चे १४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. संध्या विनोद गुर्वे वय २५ वर्ष, रा. नेहरू वार्ड तुमसर ही घरी एकटी हजर असतांना पाहुन यातील आरोपी हा फिर्यादीचे घरी अनाधिकृतपने घरात प्रवेश करून तीला शिवीगाळ करून धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. तुमसर येथे कलम ४५२,५०४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गोंडाने पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**६) लाईट बंद असल्याचे कारणावरून कॉल्लर पकडुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०३/०६/२०१७ चे १९.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा ग्रामपंचायत कार्यालय बघेडा येथे सरपंच या पदावर कार्यरत असुन यातीले आरोपीचे घरची लाईट बंद असल्याने हा फिर्यादीचे घरासमोर रोडवर येवुन फिर्यादीचे कॉल्लर पकडुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादी वसंत हरीरामजी तरटे वय ४७ वर्ष रा. गर्रा बघेडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. गोबरवाही येथे कलम २९४,५०४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मोदनकर पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**७) संगनमत करून लाईट बंद असल्याचे कारणावरून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून थापडबुक्यांनी मारपीठ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक ०३/०६/२०१७ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी दिलीप मुलचंदजी गौतम वय ३० वर्ष रा. गर्रा बघेडा हा आरोपीचे घराकडे गेला व त्यास म्हटले की माझ्या घरची लाईट ८ दिवसापासुन बंद आहे ती कधी चालु होणार असे हटकले असता यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ केले व आरोपी क्र. २ व ३ यांनी थापडबुक्यांनी मारहान करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे. गोबरवाही येथे कलम २९४,५०४,५०६,३४ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. वाघमारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत

**८) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामळे बसला धडक देवुन नुकसान झाल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक ०३/०२/२०१७ चे २०.५१ते २३.०० वा. दरम्यान यातील दोन्ही वाहन नागपुर कडुन भंडारा कडे येत असतांना यातील आरोपी वाहन चालकांनी आपआपले ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन ट्रक व बसची धडक होवुन बसचे नुकसान झाल्याने सरतर्फे फिर्यादीं पोहवा. जनबंधु यांचे रिपोर्टे वरून पोस्टे. जवाहरनगर येथे कलम २७९,४२७ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**९) विष प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :-**

दिनांक ०२/०६/२०१७ चे १५.३० वा. दर. यातील मृतक सौ. माया अनिल राऊत वय २५ वर्ष, रा. किन्ही हिने विष प्राशन केल्याने तीला औषधोपचारा करिता उपजिल्हा रूग्णालय साकोली येथे भरती केले होते. तीची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारा करिता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. ०२/०६/२०१७ चे १५.३० वा. मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पोस्टे. भंडारा येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो.स्टे. ला आणुन पेश केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. बागडे यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सफौ. पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**१०) दारूचे नशेत विषारी औषध प्राशन केल्याने उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०६/२०१७ चे ०३.५० वा. दर. यातील मृतक दिपक घनश्याम बागडे वय ३२ वर्ष, रा. राणीलक्ष्मी वार्ड भंडारा यांनी दारूचे नशेत विषारी औषध प्राशन केल्याने त्यासे औषधोपचारा करिता सा. रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉक्टरी मेमो व मृतकचे आईचे बयाना वरून सरतर्फे फिर्यादी पोका. थेर यांचे रिपोर्टे वरून पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनी किचक पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**११) अनोळखी ईसमाचा मृत्यु . :–**

दिनांक ०३/०६/२०१७ चे ०५.१५ वा. दर. यातील अनोळखी मृतक ईसम वय अंदाजे ५० वर्ष वर्ष, हा मिटेवानी शिवारातीले तुमसरे रोडे ते गोबरवाही रोडकडे जाणाऱ्या रेल्वे गेट क्र. १०६/१,९टीटी रेल्वे ट्रॅकचे बाजुला मृत स्थितीत मिळुने आल्याने फिर्यादी उपस्टेशन प्रंबधके पु.म. रेल्वे तुमसर रोड गणेश प्रेमलाल रहांगडाले वय ४० वर्ष रा. मिटेवानी८पीएमए) यांचे रिपोर्टे बरून पो.स्टे तुमसर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**१२) अवैध देशी दारु अडयावर धाडी . :–**

दिनांक ०३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा,कारधा,आंधळगाव,गोबरावाही, साकोली, पालांदुर व अडयाळ येथे अवैध देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १५ लिटर हातभट्टी दारु किंमती ७५०/–रु., ५५८ लिटर देशी विदेशी दारू+ १ ईनोव्हा गाडी+ १ सायकल किंमती ४,६२,८६०/–रु. असा एकुण किंमती ४,६३,६१०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२ तीन सिटर वाहनांवरती २२ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.


**( पी.डी. मानकर)**
**पोउपनी. सुरक्षा शाखा भंडारा**
**दुरध्वनी.क्र९०४९००३३७२**


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.